# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/04/2023 (शनिवार) सायंकाळ

---

### चोरी

१) पो.स्टे. खापा :– अंतर्गत १.५ किमी अंतरावर जवाहर टि पॉईट खापा येथे दिनांक १३/०४/२०२३ चे २३/०० वा दरम्यान फिर्यादी हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती पुर्व नाकाबंदी बंदोबस्ता दरम्यान जवाहर टि पाईन्ट खापा येथे येणारे जाणारे वाहन चेक करीत असता नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी एक संशयित वाहन कन्हान नदी कडुन खापा कडे येत असल्याने ट्रक चालक हा जवाहर टि पाईन्ट येथे पोलीसांना पाहुन काही अंतरावर आपले ताब्यातील वाहन उभे करून पळुन गेला. सदर वाहना जवळ यातील फिर्यादी व स्टॉफ यांनी पाठलाग केला असता सदर वाहनाची पाहणी केली असता सदर वाहन अशोक लेलॅन्ड कंपनीचा १२ चंक्का ट्रक क्र. एम. एच– ४० सी एम– १५७१ चा चालक व १२ चक्का ट्रक क्र. एम. एच ४० सी एम १९७१ किंमती अंदाजे १५,००,०००/–रू. व ५ ग्रास रेती २०,०००/–रू. ची वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातुन असा एकुण वाहनासह १५,२०,०००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास GPSI बारई मो. नं. ९८२२२८९५७२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील नागपुर ते भंडारा रोड येथे दिनांक १३/४/२०२३ चे २०/२५ वा. ते २०/४० वा. यातील **आरोपी नामे– मोहम्मद साकीब मोहम्मद कामील, वय २४ वर्ष, रा. खाटीकपुरा, ता. जि. दारव्हा यवतमाळ ह. मु. शेख मेहमुदरा. हसनबाग कर्बस्तानजवळ, नंदनवन नागपुर** याने माथनी शिवारातील जिओ टावरचे कंपाउंड गेटचे लॉक तोडुन जनरेटरचे दोन डोअरचे कुलुप तोडुन जनरेटरचे अल्टरनेटर डिझल व डि जी बॅटरी चोरी करुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रकाश मारोतराव घववे, वय ३३ वर्ष, रा. मनसर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास तपास पोहवा ११७४ यंगलवार हे करीत आहे.

**३) पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा इंदरवाडा राहते घरी येथे दिनांक १४/०४/२०२३ चे १२.०० ते १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्री हरीभाउ कोकाटे वय ६० वर्ष रा. इंदरवाडा ता. नरखेड जि. नागपुर व फिर्यादिची पत्नी व मुलगी घटना ता. वेळी डॉ. बाबासाहेब जयंती असल्याने घराच्या समोरील दरवाज्याला कुलुप लावुन फिर्यादीची पत्नी व मुलगी प्रथम बौध्द विहार इंदरवाडा व भारसिंगी येथे रॅली मध्ये सहभागी होण्यास गेले रॅली आटपवुन फिर्यादीची पत्नी व मुलगी घरी परत आले असता फिर्यादीच्या पत्नीने बघितले की घराच्या दाराचे कुलुप तोंडुन कोणीतरी अज्ञात ईसमाने १२.०० ते १५.०० वा. दरम्यान घराच्या आत प्रवेश करुन लोखंडी गोदरेज कपाट तोडुन व आलमारीचे लॉकर तोडुन सोन्याची पोत पदकासह दिड तोळयाची ४० बारीक मनी सोन्याचे ०४ ग्रॅमचे एकुण किंमत २९५००/— रु कपाटात ठेवलेले ५०० रु ४० नोटा व १०० रु व २०० रु १०,००० रु असा एकुन नगदी ३०,००० असा एकुन ५९,५००/— रु. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३८०, ४५४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी जोशी साहेब मो. नं. ७४९९७६०७२८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**